# पुणे मेट्रोच्या भुयारी मार्गात मेट्रोचे रूळ टाकण्याचे,विद्युत तारा बसविण्याचे आणि सिग्नलिंग यंत्रणेच्या कामांना सुरुवात



पुणे मेट्रोच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थानक ते स्वारगेट स्थानक या मार्गिकेमध्ये शिवाजीनगर स्थानक ते स्वारगेट स्थानक हा टप्पा भूमिगत आहे. या भूमिगत मार्गाची लांबी ६ किमी असून यामध्ये शिवाजीनगर, सिविल कोर्ट, बुधवार पेठ, मंडई आणि स्वारगेट हि ५ भूमिगत स्थानके आहे. दिनांक ४ जून २०२२ रोजी टनेल बोरिंग मशीनच्या साहाय्याने भूमिगत मार्गाचे काम पूर्ण करण्यात आले. त्यानंतर इतर कामांची पूर्तता केल्यानंतर काल दिनांक २५ ऑगस्ट २०२२ पासून मेट्रोचे रूळ (ट्रक) बसविणे, विद्युत तारा बसविणे आणि सिग्नलिंग यंत्रणा बसविण्याच्या कामाला सुरुवात झाली.



ट्रक टाकण्यासाठी वर्तुळाकार असणाऱ्या बोगद्याच्या खालच्या भागात काँक्रीटीकरण करून सपाटीकरण करण्यात येते. त्यानंतर दोन ट्रकमधील रुंदीनुसार काँक्रीटची ट्रक प्लिंथ बनवावी लागते. ट्रक

प्लिंथवर ट्रकच्या फिटींगसाठी लागणाऱ्या फ़िक्सिग कंपोनंट लावाव्या लागतात. हि कामे झाल्यानंतर ट्रक बसवण्याचे काम पूर्ण होते. या कामासाठी ५७ मी. लांबीच्या ट्रकचे तुकडे ३० मी भूमिगत असणाऱ्या बोगद्यात पोहचवण्यात आले आहेत. सिव्हिल कोर्ट तसेच रेंज हिल या दोन्ही ठिकाणी एकाच वेळी या कामांना सुरुवात झाली आहे.



ट्रक बसविण्याबरोबरच विद्युत तारांच्या कामालादेखील सुरुवात झाली आहे. विद्युत तारा बसविण्याचे काम रेंज हिल येथील बोगद्यातून सुरु झाले आहे. विद्युत तारा लावण्यासाठीचे फिक्चर बसविण्यासाठी बोगद्याचे भाग कास्ट करताना तारा बसविण्यासाठीचे फिक्चर लावण्यात आलेले असते. त्यामुळे बोगद्यात कोठेही ड्रिल वा खिळे ठोकण्याची गरज पडत नाही.

भूमिगत मार्गामध्ये सिग्नल यंत्रणा तसेच टेलीकम्युनिकेशन यंत्रणा लावण्यासाठी डेटा केबल, OFC केबल टाकण्यासाठीचे काम वेगाने सुरु आहे. तसेच भूमिगत मार्गामध्ये टेलिकॉम व सिग्नलसाठी लागणाऱ्या उपकारणांच्या फिटींगचे काम चालू आहे. भूमिगत मार्गांमध्ये मोबाईल सेवा देण्यासाठी इन बिल्डिंग सोल्युशन (IBS)ची यंत्रणा बसविण्यात येणार आहे. त्यासंबंधी कामे देखील येत्या काही दिवसांत सुरु होतील.

याप्रसंगी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दिक्षित यांची म्हंटले आहे कि, भूमिगत मार्गातील ट्रक, विद्युत तारा व सिग्नलिंग यंत्रणांची कामे येत्या काही महिन्यात पूर्ण होतील. आणि त्यामुळे आम्हाला येत्या काही महिन्यात भूमिगत मार्गात मेट्रोची चाचणी घेणे शक्य होईल.